**महात्मा गांधी नरेगाच्या कामावरील हजेरीपट (e-muster) निर्गमित करण्याची जबाबदारी ग्रामरोजगार सेवक यांना देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**नियोजन विभाग (रोहयो प्रभाग)**
**शासन निर्णय क्र. मग्रारो-२०२३/प्र.क्र.१६३/मग्रारो-१**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : ९ फेब्रुवारी, २०२४

**वाचा :-**

१) म.गां.रा.ग्रा.रो. हमी कायदा, २००५
२) म.गां.रा.ग्रा.रो.ह. अधिनियम (सुधारित) कायदा, २००६
३) शासन निर्णय क्र.मग्रारो २०११/प्र.क्र.४०/ रोहयो १०-अ, दि.२ मे, २०११
४) शासन निर्णय क्र. मग्रारो-२०१७/प्र.क्र..५२/मग्रारो-१, दि.२३ एप्रिल,२०१८

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र राज्यात सन १९७७ (सन २००६ मध्ये बदल केल्यापासून) रोजगार हमी अधिनियमाची अंमलबजावणी सुरू झाली आहे. या योजनेंतर्गत महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र ही योजना सुरू आहे. या योजनेच्या कामावरील हजेरीपट (e-muster) प्रचलित पद्धतीप्रमाणे न काढता त्यासाठी ग्रामपंचायतीला प्राधिकृत करणे व ग्रामपंचायत पातळीवरच ई-मस्टर निर्गमित करण्याची कार्यवाही करणे, त्यासाठी ग्रामपंचायतीला क्षमताबांधणी करणे व ई-मस्टर निर्गमित करण्याची जबाबदारी ग्रामरोजगार सेवक यांचेवर सोपविणे उचित होईल.

ग्रामपंचायत स्तरावर मग्रारोहयो चे अभिलेखे व नोंदवहया ठेवल्या जातात. या कामात ग्रामसेवकाला मदत करण्याची व संगणकीय माहिती इत्यादी भरण्यासाठी मदतनीस म्हणून ग्रामरोजगार सेवकांच्या सेवा ग्रामपंचायती मार्फत घेतल्या जातात. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचे अभिलेखे व नोंदवहया ठेवण्याची जबाबदारी व ग्रामसेवकांना सहाय्य म्हणून मदत करण्याची प्रत्यक्ष काम करण्याची जबाबदारी ग्रामरोजगार सेवकांची आहे. मनरेगा अंतर्गत ग्रामसेवकाला मदत करण्यासाठी ग्रामरोजगार सेवक यांच्या सेवा ग्रामपंचायतीमार्फत घेण्यात आल्या आहेत. व त्यांच्या सेवा महत्वाच्या आणि उपयुक्त ठरल्या आहेत.

हजेरीपट (e-muster) ग्रामपंचायत स्तरावरून निर्गमित करण्याबाबतची कार्यपध्दती महाराष्ट्रातील प्रत्येक ग्रामपंचयातीमध्ये अवलंबिल्यास मजुरांची मागणी प्राप्त झाल्यानंतर तालुका स्तरावर न जाता ग्राम पंचायत स्तरावरून Demand Upload करून ई-मस्टरची प्रत वेळीच घेतल्यास ग्राम रोजगार सेवकाला तालुका स्तरावर कामाची मागणीनुसार मजुराची यादी तालुक्याला पोहचण्याकरिता लागणारा कालावधी तसेच ई मस्टर प्राप्त करून घेण्याकरिता लागणारा वेळ वाचेल तसेच डाटा एंट्री करिता होणारा विलंब टाळता येईल. त्यानुषंगाने महात्मा गांधी नरेगाच्या कामावरील हजेरीपट (e-muster) निर्गमित करण्याची जबाबदारी ग्रामरोजगार सेवक यांना देणेबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

वाचा क्र. ३ येथील तरतूदींनूसार ग्रामपंचायत स्तरावरील ग्रामरोजगार सेवकांच्या सेवा उपलब्धतेबाबत कार्यवाही करून, त्यांच्या सेवेचा वापर महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी करण्याकरिता वाचा क्र. ४ येथील शासन निर्णय अधिक्रमित करून शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय :-**

"महात्मा गांधी नरेगाच्या कामावरील हजेरीपट (e-muster) निर्गमित करण्याची जबाबदारी ग्राम रोजगार सेवक यांना देणेबाबत."

सर्व ग्रामरोजगार सेवकांना एम.एस.सी.आय.टी. (संगणक परिक्षा) उत्तीर्ण असल्याचे निश्चित केल्याप्रमाणे सर्व ग्रामरोजगारसेवक ई-मस्टर निर्गमित करण्यासाठी सक्षम आहेत. रोजगार हमी योजनेच्या सर्व कायदेशीर कामाची जबाबदारी ग्रामरोजगारसेवक यांच्यावर आहे.

**ई-मस्टर निर्गमित करण्यासाठी ग्रामरोजगार सेवक यांची जबाबदारी.**

१) सदर कामावर हजर राहणा-या अपेक्षित मजूरांची यादी प्राप्त झाल्यानंतर www.nrega.nic.in या अधिकृत संकेतस्थळावरुन GP Login मध्ये जावून demand upload करणे.(D.३ Works Demand- demand for work entry)

२) www.nrega.nic.in या अधिकृत संकेतस्थळावरुन GP Login मध्ये जावून नविन कामाकरीता Work Code Generate करणे. (D.४ Works)

३) Demand upload झाल्यानंतर याच संकेतस्थळावरुन यादीतील मजुरांना Work allocation ची प्रक्रिया पूर्ण करणे (D.५ Works Allocation- work allocation entry) व तालुका स्तरावरील ई-मस्टरशी संबंधीत ऑपरेटर ला दुरध्वनीवरुन या बाबीची सुचना देणे.

४) तालुका स्तरावरील ऑपरेटर PO Login मधुन या Demand ला Approve/issue (D.७.१-Generate E-muster Roll) केल्यानंतर सदर ई-मस्टरची प्रिंट GP Login मधून काढणे.(D.७.२-E-Muster Roll- print E-Muster Roll)

५) प्रत्यक्षात काम सुरू झाल्यानंतर ७ दिवसांच्या कामांचे मोजमापानुसार मजुरी दराची नोंद घेऊन पूर्ण भरलेले ई-मस्टर ग्राम रोजगार सेवक डेटा एंट्री करेल (D.७.२-E-Muster Roll- Fill E-Muster Roll) व Wage list Generate(D.८ Wage List- Generate wage list for payment) व मजुरी प्रदानाच्या पुढील कार्यवाहीकरीता AAO Login ला पाठवेल.(D.८ Wage List- Add payment details to wage list & send).

जिल्हा MIS समन्वयक यांनी स्वत: तालुकास्तरावर जाऊन ई मस्टर प्रक्रियेशी संबंधीत ग्राम पंचायतीतील संबंधित ग्रामरोजगार सेवक यांना प्रशिक्षण द्यावे तसेच सर्व ग्राम पंचयातींचे GP Log in करिता User Name व Password उपलब्ध करून द्यावे.

सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी व संनियंत्रण आयुक्त, मनरेगा नागपूर यांच्यामार्फत करण्यात येईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२४०२०९१७४१०१३२१६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SANJANA PRADEEP KHOPDE

Digitally signed by SANJANA PRADEEP KHOPDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PLANNING DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=162267a166279e51cd3f1cc6e10b61ce9868a859260375a1bba3e5f88931d998, pseudonym=2911D7031787EE13B33E937FE23AAB741D4241E4, serialNumber=5835A30DD240A2D86C82FB33FB5D7BCBF513D6EBBB4EFF8873D4E0AECC934DB5, cn=SANJANA PRADEEP KHOPDE
Date: 2024.02.12 17:26:10 +05'30'

**( संजना खोपडे )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत -**

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई -३२

२. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
३. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा / विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई-३२
४. सर्व सन्माननीय विधानसभा / विधानपरिषद व संसद सदस्य, महाराष्ट्र राज्य
५. सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
६. मा. मुख्य सचिव, मुख्य सचिव कार्यालय, मंत्रालय, मुंबई-३२
७. सर्व विभागीय आयुक्त
८. आयुक्त, महात्मा गांधी नरेगा आयुक्तालय, नागपूर
९. आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे
१०. महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मंत्रालय, मुंबई-३२ (प्रसिध्दिकरिता)
११. जिल्हा कार्यक्रम समन्वयक तथा जिल्हाधिकारी (मुंबई व मुंबई उपनगरे बगळून) सर्व
१२. प्रधान मुख्य वन संरक्षक, नागपुर
१३. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
१४. संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, पुणे
१५. संचालक, फलोत्पादन, पुणे
१६. संचालक, सामाजिक वनीकरण, पुणे
१७. संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई
१८. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर
१९. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा परिक्षा), मुंबई / नागपूर
२०. सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, (मुंबई, मुंबई उपनगरे वगळून) सर्व
२१. सर्व उपजिल्हाधिकारी (रोहयो), जिल्हाधिकारी कार्यालय.
२२. सर्व उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
२३. सर्व मुख्य अभियंता व सह सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
२४. मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे, (स्थानिक स्तर) विभाग पुणे
२५. कक्ष अधिकारी, संग्राम कक्ष, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई (महाऑनलाईनवर प्रसिध्दीसाठी)
२६. निवडनस्ती (रोहयो-१)